# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/१०/२०१८
## दि.१७/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७५७/१८,भादविक ३९५,४४७,४४८,५०६(२),३२३,३५२,आर्म ॲक्ट कलम ३ (२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१) सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | विकास नाणेकर,वय-४२ वर्षे,रा.चंदननगर,नगर रोड,पुणे |
| **आरोपी** | एकुण साते ते आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०९/२०१८ रोजी ०८/४५ वा. सनं.२९/अ,१/३,नगर रोड,रामवाडी,नगर रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडिल स्वर्गीय भिमसेन नाणेकर यांनी विठोबा गणपत देवकर यांचे मालकीची सर्व्हे नं.२९/अ,१/३,नगर रोड रामवाडी,नगर रोड,पुणे येथे ५,५०० स्क्वेअर फुट जागा सन १९७३ साली भाडयाने घेतली असुन,त्याठिकाणी फिर्यादी यांचे व्यवसायासाठी गोडावुन व ऑफिस असल्याने,फिर्यादी हे स्वतः तेथे व्यवसाय करीत आहे. यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना जागा मी खरेदी केली असुन,ती जागा माझ्या मालकीची आहे असे सांगुन,ती जागा रिकामी करण्यासाठी,फिर्यादी यांचे व्यवसायाचे दुकानाचे गोडाऊन व ऑफिसचे कुलुप तोडुन,ते जीसीबीने सर्व पाडुन कडबा कुट्टी केंद्र,भुषण फायरवुड अँण्ड स्क्रॅप सेंटर,भुषन फ्रेम दुकानातील कडबाकुट्टी मशीन, ऑफिस मधील फर्निचर, काटा मापे, लोखंडी फ्रेम व भंगारचे साहित्य, महत्वाची कागदपत्रे असलेले कपाट, छोटी तिजोरी व त्यामध्ये रोख रक्कम अंदाजे ४०००/- रुपये व इतर साहित्य असे सर्वांची मिळुन अंदाजे १२ लाख रुपये किचा दरोडा टाकुन चोरुन नेले. तसेच फिर्यादी यांचा पुतण्या भुषण प्रशांत नाणेकर हा विचारण्यास गेला असता,त्यास पिस्तुल दाखवुन धमकी देवुन,फिर्यादी यांचे ताब्यातील जागेत अतिक्रमण करुन ताबा घेतला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जी.जी.मोरे ९५२७००३२२८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे २८०/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | मनोज केवरामनी,वय-३९,रा.रहाटणी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/१०/२०१८ रोजी १४/०० वा. हडपसर रेल्वे स्टेशनचे जवळ मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र शैलेश रणपीसे याचेसह कोरेगांव पार्क येथील सेवाविकास बँकेत ७,१५,०००/- रुपये भरण्यासाठी दुचाकीवरून जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांची गाडी अडवुन,त्यांना कोयताचा धाक दाखवुन, शैलेश यांचे पाठीवरील सॅक मधील ७,१५,०००/- रुपये जबरी चोरी करुन नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.जी.गवळी ८१०८५०११७७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २७८/१८,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | सुभाष पुरी ,वय-७४,रा.सॅलसबरी पार्क,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०१८ रोजी १४/०० वा. ते १४/१० वा. चे दरम्यान शिवाजीनगर,पुणे परिसरात येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादीस फोन करून,मी बँकेतुन बोलत आहे,तुमचे डेबिट कार्ड ब्लॉक झाले आहे,तुमचे डेबिट कार्डवरील नंबर मला दया असे सांगुन,कार्डावरील नंबर प्राप्त करून घेवुन,त्याआधारे फिर्यादी यांचे बँकेतील बचत खात्यामधुन ऑनलाईन माध्यमाव्दारे ९९,९९९/- रुपये काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) प्रमोद वाघमारे ९८२३८०४४१५ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** स्वारगेट पो स्टे ४२९/१८,भादविक ४२०,४०६,४०९

**फिर्यादी** राजेश राठोड,वय-४८ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे

**आरोपी** एकुण तीन इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१८/०४/२०१५ रोजी ते दि.२८/०७/२०१५ रोजीचे कालावधीत हॉटेल नटराज,स्वारगेट चौक,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी दि.२४/०५/२०१६ रोजी मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांना सदर प्रकरणाबाबत तक्रारी अर्ज दाखल केला होता. त्यावेळी सदर इसमांनी फिर्यादी यांचसोबत दि.१४/०६/२०१६ रोजी समजुतीचा करारनामा करुन देवुन,करारनाम्यात फिर्यादी यांची सर्व रक्कम दोघेही दि.२१/०७/२१७ रोजी पर्यंत टप्या-टप्याने अटी व शर्टीनुसार सर्व रक्कम व त्यावर २४ टक्के व्याज देण्याचे मान्य केले. सदर करारनामा हा तयार करुन त्यावरती फिर्यादी यांच्या सह्या घेवुन,फिर्यादीस दि.१७/०४/२०१८ या तारखेचा १,७५,००,०००/- रूपयेचा धनादेश दिला असताना,तो बॅंकेत न वटता परत आल्याने,फिर्यादी यांनी सदर इसमांशी पुन्हा संपर्क केला असता,त्यांनी फिर्यादी यांचेशी संपर्क बंद करून,करारनाम्यात ठरल्याप्रमाणे फिर्यादी यांना कोणत्याही स्वरुपाचा मोबदला न देता,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. आर.एस.राठोड ९८८१२०१५२०

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** अलंकार पो स्टे २२७/१८,भादविक ४४८,२९५,३४

**फिर्यादी** एक पुरूष,वय-४९,रा.एंरडवणा,पुणे

**आरोपी** दोन महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१७/१०/२०१८ रोजी १२/३० वा. फिर्यादी यांचे राहते घरी

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे राहते घरी नवरात्रोत्सव साजरा केला जातो. त्यासाठी फिर्यादी हे त्यांचे राहते घरात घट बसवुन,दस-याचे दिवशी घट हालवतात. त्यासाठी ते देवीला नैवद्य म्हणुन बकरा कापुन त्याचा नैवद्य अष्टमीला करत असतो. त्यानंतरच देवाचा घट हालवुन उठवला जातो. नमुद वेळी व ठिकाणी यातील नमुद महिला यांनी फिर्यादी यांचे राहते घरात अनधिकृतपणे व बेकायदेशीररित्या घुसुन,त्यांचे घरातील देवीसाठी नैवेद्य म्हणुन कापलेल्या बक-याला बाजुला करून,फिर्यादी व त्यांचे नातेवाईकांच्या भावना दुखावल्या आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.के.गोरे ९९७५०७४०६२

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** अलंकार पो स्टे २२६/१८,भादविक ४२९,प्राण्यांना निर्दयतेने वागवण्याचा कायदा १९६० चे कलम ३० प्रमाणे

**फिर्यादी** एक महिला,वय-५२ वर्षे,धंदा-समाजकार्य,रा.एरंडवणे,पुणे

**आरोपी** एक इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१७/१०/२०१८ रोजी १२/३० वा. एंरडवणा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया समाजकार्य करीत असुन,प्राणीमात्रांवर होणारे अन्यायाबाबत ज्या सामाजिक संघटना काम करत असतात,त्यांचे कामात मदत करण्याचे काम फिर्यादी करत असतात. यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील बकरा यास ओढत नेऊन,त्यास क्रुरकपणे वागणुक देऊन,सदरचा बकरा ओरडत असतानादेखील त्याला क्रुरपणे कापले म्हणुन,सदर इसमाविरूध्द वरीलप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. एस.जी.चव्हाण ९४२२६१५५७५

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ६६८/१८,भादविक ३८४,३८५,५०६,५०४

**फिर्यादी** एक पुरुष,वय-३५ रा.कोंढवा-बुद्रुक,पुणे

**आरोपी** शेरु रहमान खान,वय-३५,रा.दुरानी कॉम्प्लेक्स,मिठानगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे (अटक)

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जानेवारी २०१८ ते आजपावेतो वेळोवेळी मिठानगर कोंढवा-खुर्द,पुणे व कोंढवा भागात |
| **तपशिल** | यातील नमुद इसम शेरू खान हा फिर्यादी यांचे मिठानगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथील चालु असणा-या बांधकामावर येवुन,त्याठिकाणी बांधकाम करण्यासाठी फिर्यादी यांचेकडे एक फ्लॅट व एक दुकान तसेच २० लाख रुपयेची मागणी करुन,ती न दिल्यास फिर्यादीस काही तरी बरेवाईट करण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे नातेवाईक यांचेकडुन वेळोवेळी रोख ४ लाख रुपये खंडणी स्वरूपात दिले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.पी.शिंदे ९९२२९५५४७० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**